**प्रेस नोट ता. ०७/१२/२०२३ पोलीस स्टेशन - वाकड**

# मुंबई-ठाणे शहरात २४ घरफोडीचे गुन्हे करणारा अट्टल आरोपी पिंपरी चिंचवड शहरातील केलेल्या पहिल्याच घरफोडीत साथीदारास अटक आरोपीकडुन सोन्याचे १,२२,०००/- रुपये किंमतीचे दागीने जप्त

## वाकड पोलीस स्टेशन तपास पथकाची कामगिरी.

--- oo ---

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात दिवसा व रात्रीचे वेळी घडणारे घरफोडीचे गुन्हयांचे बाबत **मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त,पिंपरी चिंचवड,** यांनी सर्व पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांना घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणुन आरोपींना अटक करणेबाबत आदेश दिले आहेत. तसेच त्यासाठी रात्रीचे वेळी अचानक नाकाबंदी व रेकॉर्डवरील गुन्हेगारांना तपासुन कारवाई करणेबाबत आदेश दिले.

फिर्यादी नामे अमेय विजय बिर्जे वय ३७ वर्षे रा. फ्लॅट नं.सी ५०४, प्रिस्टीन प्रोलाईफ, फेज नं.१, शंकर कलाटेनगर वाकड पुणे यांनी फिर्याद दिली की, दि.१६/११/२०२३ रोजी रात्रौ ११.०० वा ते दि.१७/११/२०२३ रोजी ०२.०० वा दरम्यान त्यांचे पाचव्या माळयावरील बंद घराचे गॅलरी मधुन अज्ञात चोरटयाने प्रवेश करुन घरातील सोन्याचे दागीने घरफोडी चोरी करुन नेले आहेत अशा तक्रारीवरुन वाकड पोलीस ठाणे **गु.र.नं. ११११/२०२३ भा.द.वि. कलम ४५७,३८०** प्रमाणे गुन्हा दाखल करणेत आला आहे.

**सदरचा गुन्हा हा एका मोठया सोसायटीमध्ये आणि उंच टॉवर वर पाचव्या माळयावर गॅलरीचे सहाय्याने चढुन केलेला असल्याने वेगळया पध्दतीचा होता.** मा.पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे मा.श्री. गणेश जवादवाड,वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाकड पोलीस ठाणे यांनी तपास पथकातील सपोनि.संतोष पाटील व पोउपनि.सचिन चव्हाण यांना सदर घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणणेबाबत आदेश दिले.

दाखल गुन्हयाचे तपासात तपास पथकाने सिसीटीव्हीचे आधारे शोध घेत दोन संशयीत इसम गुन्हा घडले काळात एका मोकळया जागेतुन चालत जाताना दिसले. **पो.शि.२१०६ स्वप्नील लोखंडे, पोशि.२१७३ विनायक घार्गे, पोशि.२५०२ भास्कर भारती** या टिमने तांत्रिक व सिसीटीव्हीचे आधारे पाठपुरावा करून आरोपी एका रिक्षातुन आल्याचे निष्पन्न केले. त्यानंतर पुढील तपासात गुन्हा करणारे सदर आरोपी पालघर जिल्हयातील असल्याचे माहिती प्राप्त करून दोन्ही आरोपींना पालघर जिल्हयात जावुन शिताफीने ताब्यात घेतले. आरोपी नामे १) **अब्दुल ऊर्फ चिरा इद्रिस शेख**, वय ४७ वर्षे, रा.आदर्श निवास,रुम नं. २११,कैलास दर्शन सोसायटी समोर,अलकापुरी, नालासोपारा (पुर्व) जि.पालघर २) **धर्मेश रामआचरे दिवाकर**, वय २८ वर्षे, धंदा रिक्षा चालक, रा . ४०७, बी-विंग, नालेश्वर निवास, जेबीएस स्कुलचे जवळ, अलकापुरी, नालासोपारा (पुर्व) जि.पालघर यांनी सदरचा गुन्हा केला आहे. त्यापैकी अब्दुल ऊर्फ चिरा शेख हा घरफोडीचा सराईत गुन्हेगार असुन त्याचेवर मुंबई, पालघर, ठाणे येथील विविध पोलीस स्टेशनला एकुण **२४ घरफोडीचे गुन्हे दाखल** असलेबाबत माहीती प्राप्त झाली. आरोपींकडुन गुन्हयातील चोरीस गेले मालापैकी किं.रु.१,२२,०००/- चे सोन्याचे दागीने जप्त करणेत आले आहेत.

**आरोपीकडे केले तपासात त्याचेवर मुंबई-ठाणे परिसरात अनेक घरफोडीचे गुन्हे दाखल असल्याने पिंपरी चिंचवड व पुणे परिसरात घरफोडी केल्यास आपल्यास कोणी ओळखणार नाही तसेच आपण राहण्यास पालघर मध्ये असल्याने आपल्या पर्यंत पोलीस पोहचणार नाहीत अशा समजुतीने आरोपीने सदरचा गुन्हा केला होता. पंरतु वाकड तपास पथकाने कौशल्यपुर्ण तपास करित सदर सराईत आरोपीस त्याचे साथीदारासह अटक केली आहे.**

सदरची कारवाई मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.श्री.डॉ.संजय शिंदे सो, सह.पोलीस आयुक्त, मा.श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. डॉ.काकासाहेब डोळे सो, पोलीस उप आयुक्त,परि-२ पिंपरी चिंचवड, मा. श्री.डॉ. विशाल हिरे, सहा.पोलीस आयुक्त सो, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली मा.श्री.गणेश जवादवाड वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मा.श्री. विठ्ठल साळुंखे पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि.संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण, सपोफौ.बिभीषण कन्हेरकर, सपोफौ.बाबाजान इनामदार, सपोफौ.राजेंद्र काळे, पोहवा.संदीप गवारी, पोहवा.वंदु गिरे, पोहवा.स्वप्निल खेतले, पोहवा.दिपक साबळे, पोहवा.अतिश जाधव, पोहवा.प्रमोद कदम, पोहवा.विक्रांत चव्हाण, पोहवा.अतिक शेख, पोना.प्रशांत गिलबीले, पोना.राम तळपे, पोशि.अजय फल्ले, पोशि.भास्कर भारती, पोशि.स्वप्निल लोखंडे, पोशि.कौंतेय खराडे, पोशि.विनायक घारगे, पोशि रमेश खेडकर, पोशि.सागर पंडीत (परि-०२ कार्यालय) यांनी मिळुन केली आहे.

**अटक नामे अब्दुल ऊर्फ चिरा इद्रिस शेख, वय ४७ वर्षे, रा.आदर्श निवास,रुम नं. २११,कैलास दर्शन सोसायटी समोर,अलकापुरी, नालासोपारा (पुर्व) जि.पालघर याचेवर खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.**

| अ.क्र. | पोलीस स्टेशन | गु.रजि.नं.कलम |
|---|---|---|
| १ | तुळींज, जि.पालघर | ४९०/२०१७ भादविक४५४,३८० |
| २ | तुळींज, जि.पालघर | ७३०/२०१७ भादविक ४५४,३८० |
| ३ | तुळींज, जि.पालघर | २००/२०१८ भादविक ४५४,४५७,३८० |
| ४ | तुळींज, जि.पालघर | २२६/२०१८ भादविक ४५४,४५७,३८० |
| ५ | तुळींज, जि.पालघर | ३८०/२०२१ भादविक ४५४,४५७,३८० |
| ६ | तुळींज, जि.पालघर | ४३६/२०१७ भादविक ४५४,३८० |
| ७ | तुळींज, जि.पालघर | ५११/२०१७ भादविक ४५७,३८० |
| ८ | तुळींज, जि.पालघर | ७८५/२०१७ भादविक ४५४,४५७,३८० |
| ९ | तुळींज, जि.पालघर | ५९/२०१८ भादविक ४५४,४५७,३८० |
| १० | तुळींज, जि.पालघर | १००/२०१८ भादविक ४५७,३८० |
| ११ | तुळींज, जि.पालघर | २२२/२०१८ भादविक ४५४,४५७,३८० |
| १२ | तुळींज, जि.पालघर | २२३/२०१८ भादविक ४५४,४५७,३८० |
| १३ | तुळींज, जि.पालघर | २६०/२०१८ भादविक ४५४,४५७,३८० |
| १४ | तुळींज, जि.पालघर | २८५/२०१८ भादविक ४५४,४५७,३८० |
| १५ | तुळींज, जि.पालघर | ३४३/२०१८ भादविक ४५४,४५७,३८० |
| १६ | तुळींज, जि.पालघर | ६७०/२०१५ भादविक ४५४,४५७,३८० |
| १७ | गावदेवी जि.मुंबई | २१८/२०२१ भादविक ४५४,४५७,३८० |
| १८ | नालासोपारा जि.पालघर | ५६५/२०१४ भादविक ३२४,५०४,५०६ |
| १९ | नालासोपारा जि.पालघर | ४७४/२०१३ भादविक ४५४,४५७,३८० |
| २० | सांताक्रुझ मुंबई | ७१०/२०१४ भादविक ४५४,४५७,३८० |
| २१ | खार मुंबई | १४९/२००६ भादविक ४५४,४५७,३८० |
| २२ | सांताक्रुझ मुंबई | ६५४/२०१४ भादविक ४५७,३८०,५११ |
| २३ | सांताक्रुझ मुंबई | ५९२/२०१४ भादविक ४५४,४५७,३८० |
| २४ | सांताक्रुझ मुंबई | ६७७/२०१४ भादविक ४५४,४५७,३८० |

(डॉ.काकासाहेब डोळे)
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ-२, पिंपरी चिंचवड